**Total No. of Questions : 5]** **SEAT No. :**

**P2445** **[Total No. of Pages : 2**

# [5302]-1001
# M.A. (Part - I) (Semester - I)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 1
# व्यावहारिक व उपयोजित मराठी – 1
# (2013 पॅटर्न) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* शुध्दलेखनाची संकल्पना स्पष्ट करून शुध्दलेखनाची आवश्यकता का आहे, ते सांगा.

किंवा

खालील उताऱ्याचे मुद्रित शोधन करा.

वृतपत्राला मानवी शरिराचि उपमा दिली तर वृत संस्था हा त्याच्या पाटीचा कना म्हटला पाहिजे. कारण मानवि शरिर हे पाटीच्या कानाच्या आधारावरच उभे राहु शकते व्रतपत्रात सर्वात महत्वाची गोष्ठ अशि कि बातमि वृत पत्राना पूरवीण्याचे काम वृत संस्था करतात. आज काल वृत्तमाध्यमात क्रांति करणाऱ्या वृतवाहिन्याना एखादया घटनेचि प्राथमिक माहिती देण्याचे कामहि वृतसंस्थांच करतात.

*प्रश्न 2)* महाराष्ट्रातील विविध संस्थांचे वाङ्मयीन कार्य सांगा.

किंवा

ग्रंथाची मांडणी, सजावट, जाहिरात, वितरण इ. बाबींची सविस्तर माहिती लिहा.

*प्रश्न 3)* मुलाखतींचे प्रकार सांगून त्यांचे स्वरूप विशद करा.

किंवा

'निर्मल ग्राम' पुरस्कार मिळालेल्या सरपंचाची वृत्तपत्रासाठी मुलाखत घ्या.

*P.T.O.*

*प्रश्न 4)* प्रशासनिक पत्रव्यवहार व प्रशासनिक परिभाषा यांचा सहसंबंध स्पष्ट करा.

किंवा

सहाय्यक प्राध्यापक या पदासाठी माननीय प्राचार्य कला विज्ञान महाविद्यालय भुसावळ यांच्याकडे अर्ज करा.

*प्रश्न 5)* टीपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) मुद्रित शोधनाची आवश्यकता

ब) दिवाळी अंक

क) मुलाखतीचे तंत्र

ड) अर्जाचे प्रकार

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2446**

[Total No. of Pages : 2

# [5302]-1002
# M.A. (Part - I) (Semester - I)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 2
# मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (प्रारंभ ते 1600)
# (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'महाराष्ट्र' नामाभिधान व मराठी भाषा यांच्या उद्‌गम-विकासाची चर्चा करा.

किंवा

मराठी भाषेतील स्थित्यंतराचा थोडक्यात आढावा घ्या.

*प्रश्न 2)* मुकुंदराजांच्या आद्यत्वासंबंधीच्या वादाचा स्थूल परिचय करून द्या.

किंवा

महानुभावांच्या वाङ्मयनिर्मितीचे मराठी वाङ्मय परंपरेतील स्थान स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* संत ज्ञानेश्वरांच्या वाङ्मयनिर्मितीचे योगदान स्पष्ट करा.

किंवा

संत नामदेवाच्या विठ्ठलभक्ती विषयक अभंगांचा परामर्श घ्या.

*प्रश्न 4)* संत एकनाथांच्या वाङ्मयातून व्यक्त होणारी त्यांची लोकशिक्षकाची भूमिका विशद करा.

किंवा

मुस्लिम मराठी वाङ्मयाचे स्वरूप स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.

अ) संतांचे समाज प्रबोधन

ब) विवेकसिंधू

क) संतमेळ्याची अभंग रचना

ड) एकनाथी भागवत

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2447**

[Total No. of Pages : 1

# [5302]-1003
# M.A. (Part - I) (Semester - I)
# MARATHI
# अभ्यासपत्रिका क्र. 3
## भाषाविज्ञान : वर्णनात्मक
## (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* भाषा म्हणजे काय? ते सांगून भाषा अभ्यास पध्दती स्पष्ट करा.

किंवा

भाषाविज्ञान आणि कोशविज्ञान यांचा सहसंबंध विशद करा.

*प्रश्न 2)* स्वनाचा विनियोग म्हणजे काय? ते सांगून विनियोगाचे प्रकार स्पष्ट करा.

किंवा

खंडिताधिष्ठित स्वनिम ही संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* वाक्य म्हणजे काय? ते सांगून वाक्यविन्यास ही संकल्पना स्पष्ट करा.

किंवा

रूपिम विश्लेषणाची तंत्रे सांगा.

*प्रश्न 4)* अर्थ म्हणजे काय? ते सांगून अर्थाचे प्रकार सोदाहरण विशद करा.

किंवा

अर्थक्षेत्र या संकल्पनेचे महत्व सांगा.

*प्रश्न 5)* टीपा लिहा. (कोणत्याही दोन) :

अ) व्यावहारिक भाषा

ब) सुरावली

क) रूपांची घटना

ड) घटक विश्लेषण

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2448**

[Total No. of Pages : 10

# [5302]-1004
## M.A. (Part - I) (Semester - I)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

**खालील पाच अभ्यासपत्रिकापैकी कोणतीही एक प्रश्नपत्रिका सोडवावी**

i) ग्रामीण साहित्य

किंवा

ii) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमी (प्रारंभ ते 1818)

किंवा

iii) तौलनिक साहित्याभ्यास

किंवा

iv) वाङ्मयेतिहास लेखनविद्या

किंवा

v) अलंकार व छंद

---

### i) ग्रामीण साहित्य

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'स्वातंत्र्योतर मराठी वाङ्मयाचे स्वरूप बहुआयामी आहे' या विधानाची चर्चा करा.

किंवा

ग्रामीण साहित्यनिर्मितीमागील सामाजिक व वाङ्मयीन प्रेरणा स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* ग्रामीण साहित्यातून बदलत्या गावगाड्याचे दर्शन होते या विधानाची मीमांसा करा.

किंवा

ग्रामीण साहित्याचे देशीपण व वेगळेपण साधार स्पष्ट करा.

*P.T.O.*

*प्रश्न 3)* **प्रमाणभाषा, ग्रंथभाषा व ग्रामीणबोली यांचे ग्रामीण साहित्याच्या निवेदनातील स्वरूप स्पष्ट करा.**

**किंवा**

**ग्रामीण साहित्य व ग्रामीण साहित्य चळवळ यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.**

*प्रश्न 4)* **ग्रामीण साहित्यिक आनदं यादव यांच्या वाङ्‌मयीन कार्याचे मूल्यमापन करा.**

**किंवा**

**ग्रामीण साहित्याच्या आकलन व आस्वादासंबंधी असणारी वस्तुस्थिती व अपेक्षा स्पष्ट करा.**

*प्रश्न 5)* **कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.**

अ) **ग्रामीणतेचे घटक**

ब) **ग्रामीण साहित्य व सामाजिक बांधिलकी**

क) **बहिणाबाई चौधरी यांची कविता**

ड) **रा.रं.बोराडे यांचे कथालेखन**

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2448**

# [5302]-1004
## M.A. (Part - I) (Semester - I)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

### ii) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमि (प्रारंभ ते 1818)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-* 1) *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* परकीय आक्रमणांचा प्रारंभकालीन मराठी वाङ्मयावरील प्रभाव विशद करा.

किंवा

राजकीय स्थित्यंतरे व मराठी वाङ्मय यांचा अनुबंध स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* मध्ययुगीन कालखंडातील धर्मविषयक चळवळींचा मागोवा घ्या.

किंवा

मध्ययुगीन कालखंडातील सामाजिक स्थित्यंतराचा व वाङ्मयाचा परस्पर अनुबंध स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* मध्ययुगीन कालखंडातील वाङ्मयप्रकारांचा थोडक्यात परिचय करून द्या.

किंवा

मध्ययुगीन कालखंडाच्या युगधर्माचा मराठी वाङ्मयावरील प्रभाव स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* धर्मसंप्रदायांच्या प्रचार-प्रसाराच्या उद्देशाने कोणकोणते वाङ्मयीन आविष्कार अस्तित्वात आले? चर्चा करा.

किंवा

धार्मिक प्रचार-प्रसाराच्या मध्ययुगीन साधनांचा परिचय करून द्या.

*प्रश्न 5)* खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) वारकरी चळवळीचे तत्त्वज्ञान

ब) संस्कृती व साहित्य यांचा अनुबंध

क) कीर्तनाचे प्रकार

ड) स्व-धर्म जागृतीविषयक विचार

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2448**

# [5302]-1004
## M.A. (Part - I) (Semester - I)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

### iii) तौलनिक साहित्याभ्यास

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* आधुनिक काळातील तौलनिक साहित्याभ्यासाची आवश्यकता स्पष्ट करा.

किंवा

तौलनिक साहित्याभ्यासाची संकल्पना स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* तौलनिक साहित्यातील 'प्रभाव' आणि 'प्रभव' या संकल्पनांतील भेद स्पष्ट करा.

किंवा

'राष्ट्रीय साहित्या' ची संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* विश्व साहित्याचे स्वरूप विशद करा.

किंवा

विश्व साहित्य ठरलेल्या साहित्यकृतींचे विशेष सांगा.

*प्रश्न 4)* 'कृष्णाकाठ'व 'अंत:स्थ' या आत्मचरित्रांतील साम्य-भेद स्पष्ट करा.

किंवा

'कृष्णाकाठ' व 'अंत:स्थ' या आत्मचरित्रांतील सामाजिक स्थितीगतीचा मागोवा घ्या.

*प्रश्न 5)* खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.

अ) तौलनिक साहित्याबद्दलच्या अपेक्षा

ब) तुलनेची आवश्यकता

क) कृष्णाकाठमधील राजकीय जीवनचित्रण

ड) 'अंत:स्थ' मधील अनुभवविश्व

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2448**

# [5302]-1004
## M.A. (Part - I) (Semester - I)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

### iv) वाङ्मयेतिहास लेखनविद्या

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* इतिहासाचे तत्त्वज्ञान आणि वाङ्मयेतिहासाचे तत्त्वज्ञान यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

किंवा

वाङ्मयेतिहास व अन्य प्रकारचे इतिहास यातील साम्य-भेद स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* वाङ्मयेतिहास लेखनातील संशोधनाचे महत्व विशद करा.

किंवा

वाङ्मयेतिहास लेखनाची आवश्यकता विशद करा.

*प्रश्न 3)* वाङ्मयेतिहास लेखनविषयक पाश्चात्य संकल्पना-विचारांचा परिचय करून द्या.

किंवा

वाङ्मयेतिहास लेखनविषयक भारतीय संकल्पना-विचारांचे वेगळेपण स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* वाङ्मयेतिहास लेखनाचे लेखन रितीवरून पडणारे प्रकार नमूद करा.

किंवा

कालक्रमवाचक वाङ्मयेतिहासाचे स्वरूप उलगडून दाखवा.

*प्रश्न 5)* खालीलपैकी कोणत्याही दोहोंवर टिपा लिहा.

अ) वाङ्मयाचा भूगोल

ब) वाङ्मयप्रकारानुसारी वाङ्मयेतिहास लेखन

क) वाङ्मयेतिहासाचे पुनर्लेखन

ड) कालपट

⊖ ⊖ ⊖

Total No. of Questions : 5]

**P2448**

**[5302]-1004**
**M.A. (Part - I) (Semester - I)**
**MARATHI (मराठी)**
**अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)**
**(2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)**

**v) अलंकार व छंद**

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
*1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* अलंकारांच्या विविध व्याख्या सांगून त्यांचे स्वरूप विशद करा.

किंवा

'छंद' संकल्पना स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* अलंकार व छंदाची मराठीतील विकासात्मक वाटचाल स्पष्ट करा.

किंवा

''अलंकार व छंद हे कवितेत सौंदर्यनिर्मिती करणारी साधने आहेत'' चर्चा करा.

*प्रश्न 3)* अलंकार व छंद यांचे महत्व व गुणधर्म स्पष्ट करा.

किंवा

अलंकार व छंद यांचे काव्यरचनेतील कार्य स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* अलंकारांचे प्रकार सोदाहरण नमूद करा.

**किंवा**

छंदांचे विविध प्रकार कोणते ते लिहा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) अलंकार व गुण

ब) अभंग व ओवी

क) डॉ. माधव पटवर्धन यांचे छंदविषयक विचार

ड) बाळूताई खरे यांचे अलंकारविषयक लेखनकार्य

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2449**

[Total No. of Pages : 2

**[5302]-2001**

**M.A. (Part - I) (Semester - II)**

**MARATHI (मराठी)**

**अभ्यासपत्रिका क्र. 1**

**व्यावहारिक व उपयोजित मराठी भाग - 2**

**(2013 Pattern) (Credit System)**

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* भाषांतर आणि रूपांतर यातील साम्य-भेदाची सविस्तर चर्चा करा

किंवा

खाली दिलेल्या इंग्रजी उताऱ्याचे मराठीत भाषांतर करा.

After Gandhiji and his lawyer friends had collected the information, Gandhiji met the Governor of Bihar and had four long interviews with him. The Governor then appointed a committee of inquiry to look into the difficulties of the farmers in champaran. The commission consisted of planters and officials, and Gandhiji was taken to represent the farmers. The commission looked into the facts collected by Gandhiji and admitted that the planters had done a great injustice to the farmers. A settlement was arrived at. The planters were made to pay to the farmers twenty-five per cent of the money which they had been unjustly collecting.

*प्रश्न 2)* सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन-नियोजन करताना कोणती काळजी घ्यावी.

किंवा

नृत्य-आविष्कार कार्यक्रमाची दूरदर्शनसाठी निवेदन संहिता तयार करा.

*प्रश्न 3)* 'जनसंपर्क कौशल्याची तंत्रे व जनसंपर्क कौशल्याची भाषा' यावर चर्चा करा.

किंवा

विद्यापीठाचा जनसंपर्क आधिकारी म्हणून विद्यार्थ्यांशी कसा संपर्क साधाल? याविषयी सविस्तर लिहा.

*प्रश्न 4)* प्रकल्पलेखनासाठी विषय निवडतांना प्रमुख मुद्दे कोणते असतील, ते सविस्तर लिहा.

किंवा

प्रकल्पलेखन म्हणजे काय ते सांगून प्रकल्पलेखनासाठी आवश्यक असलेली कौशल्ये सांगा.

*प्रश्न 5)* टीपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) भाषांतरातील अडचणी

ब) निवेदनशैली

क) बॅंकेतील जनसंपर्क अधिकारी

ड) आकाशवाणी या प्रसारमाध्यमाची कार्यपध्दती

⊖⊖⊖

**Total No. of Questions : 5]** **SEAT No. :**

**P2450** **[Total No. of Pages : 2**

# [5302]-2002
# M.A. (Part - I) (Semester - II)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 2 MR-2
# मध्ययुगीन मराठी वाङ्मयाचा इतिहास (इ.स. 1600 ते 1818)
# (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–*
*1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* संत तुकारामांनी त्यांच्या अभंगांद्वारे केलेले लोकप्रबोधन विशद करा.

किंवा

'समर्थ रामदासांच्या वाङ्मयातून' राजकारण, सावधपण आणि प्रयत्न' यांचे दर्शन घडते' हे विधान स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* पंडिती कवींनी मराठी वाङ्मयात विविध रचनाप्रकारांची भर घातली या विधानाची चर्चा करा.

किंवा

रघुनाथ पंडिताच्या 'दमयंती स्वयंवर' या ग्रंथाचे अंतरंग अलगडून दाखवा.

*प्रश्न 3)* 'बखरींनी मराठी गद्याचे दालन समृद्ध केले' हे विधान सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

'भाऊसाहेबांची बखर' या साहित्यकृतीचा सविस्तर परिचय द्या.

*प्रश्न 4)* 'पोवाडा' या वाङ्मयप्रकारामागील प्रेरणा व स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

शाहिरी वाङ्मयाचे प्रकार सांगून 'लावणी' वाङ्मयाचे स्वरूप स्पष्ट करा.

***P.T.O.***

*प्रश्न 5)* टीपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) तुकाराम शिष्या संत बहेणाबाई

ब) कृष्णदयार्णवांचा ‘हरिवरदा’

क) ऐतिहासिक पत्रव्यवहाराचे स्वरूप

ड) शाहीर होनाजी बाळा

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2451**

[Total No. of Pages : 2

# [5302]-2003
## M.A. (Part - I) (Semester - II)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 3
## भाषाविज्ञान : सामाजिक
## (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहे.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* सामाजिक भाषाविज्ञानाची संकल्पना स्पष्ट करून स्वरूप विशद करा.

किंवा

भाषा आणि समाज यांचा परस्परसंबंध स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* 'आर्थिक वर्गव्यवस्थेनुसार भाषा बदलते', सोदाहरण चर्चा करा.

किंवा

भाषेचा विविध क्षेत्रीय वापर कसा होतो, ते सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* 'लिंगभेदानुसारी भाषेचा वापर वैशिष्ट्यपूर्ण असतो.' उदाहरणासह स्पष्ट करा.

किंवा

सामाजिक परंपरा आणि विविध सामाजिक संस्था यांच्या विकासातील भाषेचे स्थान स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* परभाषेच्या संपर्कातून नवभाषानिर्मितीची प्रक्रिया कशी घडते, ते सांगा.

किंवा

समाजातील नवव्यवस्थांच्या उदयाची कारणे सांगून त्यांच्या आविष्कार पध्दती सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* टीपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) बोलीभाषा

ब) भाषा आणि विविध व्यवसाय क्षेत्रे

क) सांस्कृतिक व्यवस्थेतील भाषेचे स्थान

ड) धार्मिक लघुक्षेत्रे आणि भाषा

**Total No. of Questions : 5]** **SEAT No. :**

**P2452** **[Total No. of Pages : 10**

# [5302]-2004
# M.A. (Part - I) (Semester - II)
# MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## i) दलित साहित्य
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

**खालील पाच अभ्यासपत्रिकापैकी कोणतेही एक प्रश्नपत्रिका सोडवावी:**

i) दलित साहित्य

किंवा

ii) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमि (1818 ते 1960)

किंवा

iii) तौलनिक साहित्याभ्यास व भाषांतर मीमांसा

किंवा

iv) वाङ्मयेतिहास लेखनविद्या (भाग–२)

किंवा

v) व्याकरण

---

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–*

*1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*

*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* दलित साहित्यातून समग्र मानवी मूल्यांचे भान कशाप्रकारे व्यक्त होते याची चर्चा करा.

किंवा

दलित साहित्य निर्मितीची कारणे सांगून त्याचे स्वरूप विशद करा.

*प्रश्न 2)* 'दलित साहित्य' पुनरूत्थानाच्या चळवळींतून निर्माण होत आहे. या विधानाची साधक–बाधक चर्चा करा.

किंवा

दलित साहित्यातील वेदना, नकार, बंडखोरी यांचे स्वरूप स्पष्ट करा.

*P.T.O.*

*प्रश्न 3)* दलित साहित्यातील कथालेखनाचा परामर्श घ्या.

किंवा

'दलित साहित्यात' 'कादंबरी' हा वाङ्मयप्रकार प्रबल दिसत नाही' या विधानाची चर्चा करा.

*प्रश्न 4)* दलित साहित्याचे वेगळेपण स्पष्ट करा.

किंवा

'दलित साहित्याच्या भाषेत आक्रस्ताळेपणा व तोचतोचपणा दिसून येतो.' या विधानाची साधक-बांधक चर्चा करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) 'दलित' संज्ञा विषयक मतप्रवाह

ब) दलित साहित्याची भाषा

क) 'आमचा बाप आणि आम्ही'

ड) दलित साहित्याचा आस्वाद व आकलन

⊖⊖⊖

**Total No. of Questions : 5]**

**P2452**

# [5302]-2004
## M.A. (Part - I) (Semester - II)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## ii) मराठी वाङ्मयाची सांस्कृतिक पार्श्वभूमि (1818 ते 1960) सत्र-2
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'महाराष्ट्रातील समाजजीवनावर इंग्रजी सत्तेच्या उदयाचा परिणाम झाला' या विधानाची चर्चा करा.

किंवा

'स्वधर्मरक्षण ही अव्वल इंग्रजी काळातील नियतकालिकांच्या निर्मितीमागील एक प्रेरणा होती' हे विधान स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* 'अर्वाचीन मराठी साहित्याला पाश्चात्य व भारतीय पूर्व-साहित्याचा आधार आहे' कसे ते सांगा.

किंवा

केशवसुतांच्या काव्यातून तत्कालीन सामाजिक जीवनाचे प्रतिबिंब कसे आढळते ते सोदाहरण सांगा.

*प्रश्न 3)* 1818 ते 1960 या कालखंडातील विविध राजकीय विचारसरणींचा आढावा घ्या.

किंवा

'स्वातंत्र्याकांक्षा ही तत्कालीन मराठी वाङ्मयाची एक प्रेरणा होती' हे विधान ठळक साहित्यकृतींच्या आधारे स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* अर्वाचीन काळातील साहित्य प्रचाराच्या विविध माध्यमांचा थोडक्यात परिचय करून द्या.

किंवा

'महाराष्ट्रातील विविध साहित्य संस्थांच्या वाङ्मयीन कार्याचा परिणाम मराठी अभिरूचीवर झाला' या विधानाची साधक-बाधक चर्चा करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) सार्वजनिक सत्यधर्म

ब) ह. ना. आपटे यांची ऐतिहासिक कादंबरी

क) 'कीचकवध' नाटक

ड) मराठी अभिरूची आणि आकाशवाणी

⊖ ⊖ ⊖

**Total No. of Questions : 5]**

**P2452**

# [5302]-2004
# M.A. (Part - I) (Semester - II)
# MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## iii) भाषांतर मीमांसा – सत्र–2
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–* *1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* भाषांतर म्हणजे काय? ते सांगून भाषांतर करताना कोणती पथ्ये पाळावीत? ते लिहा.

किंवा

भाषांतर आणि रूपांतर या संकल्पना स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* अभिजात साहित्याचे विशेष सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

अभिजात साहित्याचे भाषांतर करताना येणाऱ्या अडचणींचा परामर्श घ्या.

*प्रश्न 3)* प्रादेशिक वाङ्मयीन कृतीच्या भाषांतरासाठी कोणती पथ्ये पाळावीत ते स्पष्ट करा.

किंवा

वाङ्मय प्रकारानुसार भाषांतराचे स्वरूप कसे असते ते सांगा.

*प्रश्न 4)* विजय तेंडूलकर लिखित 'घाशीराम कोतवाल' नाटकातून तत्कालीन समाजजीवनाचे दर्शन घडते, स्पष्ट करा.

**किंवा**

'हयवदन' या नाटकातील प्रतिकात्मकता स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोन विषयांवर टीपा लिहा.

अ) मूलनिष्ठ भाषांतर

ब) अभिजात साहित्यकृती संकल्पना

क) कादंबरीचे भाषांतर

ड) 'हयवदन' चे अनुवाद कौशल्य

Total No. of Questions : 5]

**P2452**

# [5302]-2004
# M.A. (Part - I) (Semester - II)
# MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## iv) वाङ्मयेतिहास लेखनविद्या : भाग – 2
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–* *1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* बहुभाषिक राष्ट्रातील वाङ्मयेतिहासाच्या लेखनाचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

मध्ययुगीन मराठी वाङ्मयेतिहास लेखनातील उद्‌भवणाऱ्या समस्या व अडचणींचा परामर्श घ्या.

*प्रश्न 2)* वि. ल. भावे ते महाराष्ट्र साहित्य परिषद वाङ्मयेतिहास लेखन वाटचालीचा परामर्श घ्या.

किंवा

अर्वाचीन मराठी वाङ्मयेतिहास लेखन वाटचालीचा परामर्श घ्या.

*प्रश्न 3)* अ.ना.देशपांडे व ल. रा. नसिराबादकर ह्या वाङ्मयेतिहासकारांच्या कार्याचे गुणविशेष लिहा.

किंवा

स.गं.मालशे व गं.ना. जोगळेकर यांच्या वाङ्मयेतिहास लेखनाची भूमिका स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* मराठीतील वाङ्मयेतिहास विचारांच्या वाटचालीची माहिती द्या.

किंवा

'माटे-बेडेकर वादाने मराठी वाङ्मयेतिहास लेखनास वेगळे वळण मिळाले:- चर्चा करा.

*प्रश्न 5)* टीपा लिहा. (कोणत्याही दोन)

अ) भारतीय वाङ्मयेतिहासाची संकल्पना

ब) मराठी वाङ्मयेतिहासाचे इंग्रजी भाषेतील लेखन

क) व. दि. कुलकर्णी यांचे वाङ्मयेतिहास लेखन कार्य

ड) स्वातंत्र्यपूर्व मराठी वाङ्मयेतिहास विचार

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2452**

# [5302]-2004
# M.A. (Part - I) (Semester - II)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 4 (ऐच्छिक)
## v) व्याकरण
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
*1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* व्याकरण विषयक विविध मीमांसकांनी केलेल्या व्याख्यांचा परामर्श घ्या.

किंवा

'व्याकरणात शुद्ध बोलणे व शुद्ध लिहिणे हे फार महत्वाचे असते' –कसे ते सोदाहरण लिहा.

*प्रश्न 2)* व्याकरण व भाषा यांतील परस्पर संबंधाची पार्श्वभूमी विशद करा.

किंवा

मराठी भाषेतील व्याकरणावरील हिंदी इंग्रजी भाषेच्या व्याकरणाचा प्रभाव विशद करा.

*प्रश्न 3)* तुलनात्मक व ऐतिहासिक व्याकरण प्रकारांचे स्पष्टीकरण करा.

किंवा

व्याकरणातील वाक्य पृथ:क्करणाचे स्थान व महत्व लिहा.

*प्रश्न 4)* मराठीतील वर्ग विचारांची माहिती लिहा.

किंवा

कृं.पां. कुलकर्णी यांच्या व्याकरण विषयक लेखनाचा परामर्श घ्या.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) व्याकरणाची गरज

ब) शब्दांच्या जाती

क) व्याकरणातील वाक्य रचनेचे स्वरूप

ड) प्र. ना. दीक्षित यांचा व्याकरण विचार

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2453**

[Total No. of Pages : 2

# [5302]-3001
# M.A. (Part - II) (Semester - III)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 5
# प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार
# (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* विकास पत्रकारितेचे प्रयोजन व व्याप्ती स्पष्ट करा.

किंवा

मुद्रित माध्यमासाठी आकर्षक प्रवासवर्णन लिहिताना त्यात कोण कोणत्या गोष्टींचा समावेश होतो?

*प्रश्न 2)* 'कलानिहाय सर्जनात्मक आस्वादाचे स्वरूप बदलते'. स्पष्ट करा.

किंवा

तुम्हास आवडलेल्या कोणत्याही एका चित्रपटाचा आस्वादात्मक परिचय करून द्या.

*प्रश्न 3)* पुस्तकाचे परीक्षण करताना कोणकोणत्या गोष्टींचा त्यात समावेश करावा लागतो?

किंवा

तुम्हास आवडलेल्या एका लेखकाचा परिचय द्या.

*P.T.O.*

*प्रश्न 4)* श्राव्य माध्यमाचे स्वरूप आणि वैशिष्ट्ये विशद करा.

किंवा

श्राव्य माध्यमासाठी बातमीचे लेखन करताना कोणती पथ्ये पाळावी लागतात?

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) वृत्तसंस्कृतीचे स्वरूप

ब) नाटकाचा आस्वाद

क) समाजसेवकाचा व्यक्तिवेध

ड) श्राव्य माध्यमासाठी भाषण

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2454**

[Total No. of Pages : 2

## [5302]-3002

## M.A. (Part - II) (Semester - III)

## MARATHI (मराठी)

## अभ्यासपत्रिका क्र. 6

## साहित्य : समीक्षा व संशोधन

## (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*

*1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'समीक्षेमुळे साहित्याच्या गुणदोषांची चर्चा होते' कशी ते सांगा.

किंवा

समीक्षेचे स्वरूप व वैशिष्ट्ये स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* कोणकोणत्या गुणांमुळे 'आदर्श समीक्षक' ही संकल्पना सार्थक ठरते. ते सविस्तर लिहा.

किंवा

साहित्यकृतीला योग्य न्याय देण्यासाठी समीक्षकाला कोणकोणती पथ्ये पाळावी लागतात ते सांगा.

*प्रश्न 3)* ऐतिहासिक समीक्षा पध्दतीचे स्वरूप व महत्व स्पष्ट करा.

किंवा

साहित्याची समीक्षा कोणकोणत्या समीक्षा पध्दतीच्या साह्याने केली जाते ते सांगा.

*प्रश्न 4)* इ.स. 1874 ते 1920 या कालखंडातील प्रमुख समीक्षकांच्या कार्याचा परिचय करून द्या.

किंवा

इ.स. 1960 ते इ.स. 1975 या कालखंडातील आंबेडकरवादी कवितेवरील समीक्षेची वैशिष्ट्ये थोडक्यात लिहा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) समीक्षेची प्रयोजने

ब) समीक्षा आणि जीवनमूल्ये

क) स्त्रीवादी समीक्षा

ड) ग्रामीण कथा व समीक्षा

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2455**

[Total No. of Pages : 4

# [5302]-3003
# M.A. (Part - II) (Semester - III)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 7
# विशेष लेखकाचा अभ्यास (मध्ययुगीन/अर्वाचीन)
# मध्ययुगीन : संत जनाबाई
# (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* मध्ययुगीन कालखंडातील वारकरी संप्रदायाचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

मध्ययुगीन कालखंडातील वारकरी संत परंपरेचे योगदान स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* संत जनाबाईंचे व्यक्तिचित्र तुमच्या शब्दात रेखाटा

किंवा

संत जनाबाईंनी 'गुरू संत नामदेवांविषयी आदरभाव व्यक्त करताना केलेल्या अभंगाचा परामर्श घ्या.

*प्रश्न 3)* संत जनाबाईंच्या 'प्रल्हादचरित्र' व 'बाळक्रीडा' या वाङ्मयकृतीतील आशय स्पष्ट करा.

किंवा

संत जनाबाईंच्या अंभगातील वैविध्यता सविस्तर स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* 'आत्मपर-भावपरता' जनाबाईंच्या अभंगाचे प्रधानसत्र आहे' या विधानाची चर्चा करा.

किंवा

संत जनाबाईंच्या 'आत्मपर अभंगाचे स्वरूप विशद करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) मध्ययुगीन वारकरी संत परंपरा

ब) संत कवयित्रि-कान्होपात्रा

क) संत जनाबाई पाळणा व भारूड

ड) ''जनी जाय पाणियासी । मागे धावे हृषिकेशी।''

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2455**

# [5302]-3003
# M.A. (Part - II) (Semester - III)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 7
## विशेष लेखकाचा अभ्यास (मध्ययुगीन/अर्वाचीन)
## यशवंतराव चव्हाण (अर्वाचीन लेखक)
## (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–*
1) *सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* यशवंतराव चव्हाण यांच्या वाङ्मयीन जडण घडणीचा सविस्तर परिचय करून द्या.

किंवा

'लेखक आणि समाजचिंतक' यशवंतराव चव्हाण 'कृष्णाकाठ' मधून ठळकपणे दिसतात सविस्तर लिहा.

*प्रश्न 2)* 'कृष्णाकाठ' मधून प्रतिभावान व सृजनशील यशवंतराव चव्हाण यांचे प्रभावी दर्शन घडते' सोदाहरण लिहा.

किंवा

''कृष्णाकाठ'' मधून यशवंतराव चव्हाण यांच्या आत्मशोधाचा आणि जीवनशोधचा प्रत्यय येतो' स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* यशवंतराव चव्हाण यांच्या भाषणसंग्रहातून स्पष्ट होणाची वैचारिक भूमिका सविस्तर लिहा.

किंवा

'युगांतर' या भाषण संग्रहातून कलाभान व समाजभान कसे प्रगते ते सविस्तर लिहा.

*प्रश्न 4)* 'लेखनाचा हेतू हेच समाज परिवर्तन' याचे दर्शन यशवंतराव चव्हाण यांच्या लेखसंग्रह व पत्रलेखन संग्रहातून प्रत्ययास येतो. चर्चा करा.

किंवा

'यशवंतराव चव्हाण यांच्या लेखसंग्रहातून व पत्रसंग्रहातून ललित गद्याची अनेक वैशिष्ट्ये प्रकटतात' सविस्तर लिहा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) यशवंतराव चव्हाण यांची जडणघडण

ब) 'कृष्णाकाठ' मधील वेगूताई

क) यशवंतराव चव्हाण यांच्या भूमिकेतील भूमिका

ड) यशवंतराव चव्हाण यांचे विदेशदर्शन

**Total No. of Questions : 5]** **SEAT No. :**

**P2456** **[Total No. of Pages : 10**

# [5302]-3004
# M.A. (Part - II) (Semester - III)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
# (2013 Pattern) (Credit System)

## खालील अभ्यासपत्रिकांपैकी कोणतेही एक प्रश्नपत्रिका सोडवावी

i) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

ii) सौंदर्यशास्त्र

iii) लेखनविद्या व निबंधलेखन

iv) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

v) साहित्य: सर्जन व उपयोजन

---

## i) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*

*1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* लोकसाहित्याचे इतिहास, मानसशास्त्र व धर्मशास्त्राशी असलेले अनुबंध स्पष्ट करा.

किंवा

लोकसाहित्याची प्रयोजन कोणती ते लिहा.

*प्रश्न 2)* लोकसाहित्याच्या अभ्यासाचे विविध संप्रदाय स्पष्ट करा.

किंवा

लोकसाहित्याच्या अभ्यासाची भारतीय परंपरा स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* लोकसाहित्य आणि लोकजीवन यांच्यातील संबधांचा परामर्श घ्या.

किंवा

'निसर्ग आणि लोकसाहित्य यांचे अतूट नाते आहे' स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* अर्वाचीन साहित्य व लोकसाहित्य यांच्यातील अनुबंधाचा परामर्श घ्या.

किंवा

'संतसाहित्यात लोकसाहित्याचे प्रतिबिंब दिसते' सविस्तर विवेचन करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) 'लोक' संकल्पना

ब) लोकसाहित्याची आस्वादकता

क) लोकसाहित्यातील लोकसमजुती

ड) म्हणी व उखाणे

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2456**

# [5302]-3004
# M.A. (Part - II) (Semester - III)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
# (2013 Pattern) (Credit System)

## ii) सौंदर्यशास्त्र

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'सौंदर्यशास्त्र हे स्वतंत्र विज्ञानही नव्हे किंवा मनोविज्ञानाचे उपांगही नव्हे' या विधानाची चर्चा करा.

किंवा

सौंदर्यशास्त्र आणि समीक्षा संकल्पना यांच्यातील परस्परसंबंध स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* सौंदर्यविधान आणि मूल्यविधान यांच्यातील साम्यभेद स्पष्ट करा.

किंवा

सौंदर्यशास्त्रातील द्विध्रुवात्मकता साधार स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* सौंदर्यविषयक प्रमुख सिध्दांतांचा थोडक्यात परिचय द्या.

किंवा

हर्बट स्पेन्सरचा क्रिडा सिद्धांत स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* सौंदर्यानुभवाची तटस्थता सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

सौंदर्यानुभवातील स्वायत्तता आणि विविधता स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) सौंदर्यशास्त्र आणि नवे शोध

ब) सौंदर्यविधान आणि नीतिविधान

क) भावनिष्ठेचा सिध्दांत

ड) सौंदर्यानुभवातील ज्ञानशक्तीचे मुक्तमेलन

⊖ ⊖ ⊖

Total No. of Questions : 5]

**P2456**

# [5302]-3004
## M.A. (Part - II) (Semester - III)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
## (2013 Pattern) (Credit System)

### iii) लेखनविद्या व निबंधलेखन

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-* *1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* भाषा आणि जीवनव्यवहाराचा अनुबंध स्पष्ट करा.

किंवा

मानवी जीवन व्यवहारात संवादाचे एकूण महत्व व कार्य काय आहे? ते सोदाहरण लिहा.

*प्रश्न 2)* संवाद ही संकल्पना स्पष्ट करून संवादातील अडथळ्यांचा परामर्श घ्या.

किंवा

संवाद प्रक्रियेचे स्वरूप सांगून संवादविषयक सिध्दांत सविस्तर लिहा.

*प्रश्न 3)* अर्थ म्हणजे काय? संवादप्रक्रियेत अर्थनिश्चिती कशी केली जाते? ते लिहा.

किंवा

संवाद प्रक्रियेतील भाषेचे स्थान आणि स्वरूप स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* संवादक्षमतेचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

संवादकौशल्याची साहित्यातील सहभागाची सविस्तर चर्चा करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) संवादाची गरज

ब) विविध संवादमाध्यमे

क) संवादप्रक्रियेचे घटक

ड) मराठीची भाषिक कौशल्ये

Total No. of Questions : 5]

**P2456**

# [5302]-3004
# M.A. (Part - II) (Semester - III)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
# (2013 Pattern) (Credit System)

**iv) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टिने अभ्यास**

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'व्यक्ती, समाज व संस्कृती यांची सांगड वैचारिक साहित्यातून उत्तम प्रकारे चित्रित होते' या विधानाचे मर्म उलगडून दाखवा.

किंवा

'वैचारिक साहित्याची आवश्यकता काळानुरूप बदलती असते' स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* मराठीतील वैचारिक साहित्याची पार्श्वभूमी साधार विशद करा.

किंवा

इ.स. 1875 ते 1920 कालखंडातील निबंध वाङ्मयातील वैचारिक मूल्ये स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* विठ्ठल रामजी शिंदे यांच्या समाजसुधारणांविषयीच्या वैचारिक साहित्याचा परामर्श घ्या.

किंवा

मराठी वैचारिक साहित्यावर आंबेडकर वादाचा कोणता प्रभाव पडला सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* न्या.रानडे, गो.ग. आगरकर यांच्या धर्मसुधारणा विषयक विचारांचा आढावा घ्या.

किंवा

मराठी वैचारिक साहित्यातील निबंध वाङ्मयाची भाषाशैली स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) काळकर्ते शि.म. परांजपे

ब) गीता रहस्य

क) स्वा. सावरकरांचे वैचारिक लेखन

ड) वैचारिक साहित्याच्या प्रेरणा

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2456**

# [5302]-3004
# M.A. (Part - II) (Semester - III)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
# (2013 Pattern) (Credit System)

## v) साहित्य : सर्जन व उपयोजन

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-* *1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* साहित्य सर्जन म्हणजे काय? त्याचे उपयोजन करण्यामागील प्रक्रियेचा आढावा घ्या.

किंवा

साहित्य सर्जन म्हणजे काय ते सांगून साहित्य सर्जनामागील कोणत्या प्रेरणा आहेत? ते लिहा.

*प्रश्न 2)* सर्जनशील साहित्य म्हणजे लेखकाचा आत्माविष्कार असे का म्हटले जाते? सविस्तर लिहा.

किंवा

साहित्य निर्मिती प्रक्रियेसंदर्भातील भारतीय मीमांसकांच्या मतांचा आढावा घ्या.

*प्रश्न 3)* 'कथा' या साहित्यप्रकाराची वैशिष्ट्ये सांगा.

किंवा

'दीर्घकथनपरता' व 'जीवनसमांतरता'या सूत्रांच्या आधारे 'कादंबरी' या साहित्य प्रकाराचे वेगळेपण स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* विशिष्ट साहित्याची निर्मिती करताना समकालीन कोणती परिस्थिती लक्षात घेतली पाहिजे, ते सोदाहरण लिहा.

किंवा

साहित्यप्रकारांची जाणीवपूर्वक निर्मिती करताना पूर्व तयारी करण्यासाठी कोणत्या घटकांचा विचार केला जातो? ते लिहा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) साहित्य सर्जनाचे स्वरूप

ब) पाश्चात्य विचारवंत-वर्ड स्वर्थ

क) वैचारिक निबंधाची सर्जनशीलता

ड) कविमनावरील समकालीन परिस्थितीचा प्रभाव

⊖⊖⊖

**Total No. of Questions : 5]** **SEAT No. :**

**P2457** **[Total No. of Pages : 2**

# [5302]-4001
# M.A. (Part - II) (Semester - IV)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 5
# प्रसारमाध्यमे आणि साहित्यव्यवहार
# (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :–* *1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* वृत्तसंकलनाची संकल्पना आणि स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

'लोकसाहित्य' संदर्भातील वृत्तसंकलनाचे स्वरूप स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* जाहिरात लेखनासाठी आवश्यक घटकांची चर्चा करून माध्यमनिहाय जाहिरात लेखन करताना कोणती काळजी घ्यावी लागते?

किंवा

'सर्व क्षेत्रात मराठी भाषेचा वापर करा' असे आवाहन करणारी जाहिरात आकाशवाणी व वर्तमानपत्रासाठी तयार करा.

*प्रश्न 3)* 'इतर ललित लेखनापेक्षा पटकथालेखन वेगळ्या रितीने केले जाते'. या विधानाचा परामर्श घ्या.

किंवा

'चित्रपट आणि दूरदर्शन मालिका यासाठी पटकथालेखन करताना ते वेगवेगळ्या रितीने करावे लागते' सोदाहरण सांगा.

*P.T.O.*

*प्रश्न 4)* कादंबरीतून पटकथेत रूपांतर करताना त्यात कोणते बदल होतात? सोदाहरण चर्चा करा.

किंवा

नाटक आणि पटकथा या साहित्यप्रकारातील साम्यभेद सोदाहरण सांगा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) प्रासंगिक कार्यक्रमाचे वृत्तसंकलन

ब) दृक्‌श्राव्य माध्यमासाठी जाहिरातलेखन

क) दूरदर्शन मालिकेचे पटकथालेखन

ड) रूपांतरकौशल्य

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2458**

[Total No. of Pages : 2

# [5302]-4002
# M.A. (Part - II) (Semester - IV)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 6
# साहित्यः समीक्षा व संशोधन
# (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
*1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहे.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'संशोधन' संकल्पना स्पष्ट करून संशोधनाच्या विविध प्रेरणांचा परिचय करून द्या.

किंवा

संशोधन प्रक्रियेतील विविध टप्पे कोणते ते सविस्तर लिहा.

*प्रश्न 2)* वाङ्मयीन संशोधनाच्या विविध अभ्यासक्षेत्राचा परिचय करून द्या.

किंवा

'लेखकाचा अभ्यास' या विषयावर संशोधन आराखडा तयार करा.

*प्रश्न 3)* आंतर्विद्या क्षेत्रीय संशोधन संकल्पना स्पष्ट करून साहित्य आणि समाजशास्त्र यातील संबंध स्पष्ट करा.

किंवा

आंतर्विद्या क्षेत्रीय संशोधनातील साहित्य आणि सौंदर्यशास्त्र यातील अनुबंध स्पष्ट करा.

*P.T.O.*

*प्रश्न 4)* मध्ययुगीन मराठी वाङ्मयाच्या संशोधनाच्या परंपरेचा परिचय करून द्या.

किंवा

भाषाविषयक संशोधन करताना येणाऱ्या अडचणींचा सविस्तर परिचय करून द्या.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) संशोधकाच्या अंगी असणारे गुण

ब) कालखंडाचा अभ्यास

क) साहित्य आणि संस्कृती

ड) मराठीचे पाश्चात्य संशोधक

⊖ ⊖ ⊖

Total No. of Questions : 5]

SEAT No. :

**P2459**

[Total No. of Pages : 2

# [5302]-4003
# M.A. (Part - II) (Semester - IV)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 7
# विशेष लेखकाचा अभ्यास (मध्ययुगीन/अर्वाचीन) संत जनाबाई/यशवंतराव चव्हाण
# (2013 Pattern) (Credit System)

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*
2) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'विठो माझा लेकुरवाळा/संगे लेकुरांचा मेळा/या अभंगातील भावसौंदर्य सोदाहरण विशद करा.

किंवा

संत जनाबाईचे विठ्ठलाशी असलेले नाते त्यांच्या अभंगाद्वारे विशद करा.

*प्रश्न 2)* 'म्हणे नामयाची दासी।' किंवा 'म्हणे नामयाची जनी।' या नाम मुद्रेचे वैशिष्ट्ये सांगा.

किंवा

संत नामदेवांचा प्रभाव संत जनाबाईंच्या अभंगातून जाणवतो सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* 'प्रगाढ जीवननिष्ठा हाच जनाबाईंच्या अभंगाचा कणा आहे' साधार चर्चा करा.

किंवा

आध्यात्मिक जीवनसाधनेवरील दृढ विश्वास जनाबाईंच्या अभंगातून जाणवतो, सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* संत जनाबाईंच्या अभंगाची भाषा लोकसाहित्याच्या जवळची वाटते चर्चा करा.

किंवा

जनाबाईंच्या अभंगातील प्रतिमा स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) जनाबाईंच्या आध्यात्मिक जाणिवांचा विलास

ब) जनी व विठ्ठलाचे नाते

क) संत नामदेवांची जनाबाई विजयीची कणव

ड) 'अरे अरे विठ्या मूळ मायेच्या कारट्या!' भाषाशैली

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]  SEAT No. :

**P2460**  [Total No. of Pages : 10

# [5302]-4004
# M.A. (Part - II) (Semester - IV)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)
## खालील अभ्यासपत्रिकापैकी कोणतेही एक प्रश्नपत्रिका सोडवावी

i) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

ii) सौंदर्यशास्त्र

iii) लेखनविद्या व निबंधलेखन

iv) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

v) साहित्य: सर्जन व उपयोजन

---

### i) लोकसाहित्याची मूलतत्त्वे आणि मराठी लोकसाहित्य

*वेळ : 3 तास]*  *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* लोकगीते व आधुनिक गेय कविता यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

किंवा

लोकगीते व संतकवींची कविता यांच्यातील अनुबंध स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* लोकसाहित्याच्या कलात्मक सौंदर्याचे स्वरूप स्पष्ट करा.

किंवा

लोकसाहित्याचा सादरीकरणातील जाणिवा आणि आस्वाद्यता यांचे स्पष्टीकरण करा.

*प्रश्न 3)* लोकनाट्याचे स्वरूप व विशेष स्पष्ट करा.

किंवा

'जागरण' या विधीनाट्याचे स्वरूप स्पष्ट करा.

*P.T.O.*

*प्रश्न 4)* लोकसाहित्याच्या अभ्यासात योगदान देणाऱ्या संस्थांचा परिचय करून द्या.

किंवा

प्रभाकर मांडे यांचे लोकसाहित्याचा अभ्यासातील योगदान स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) साखळीगीते

ब) उत्पत्तीकथा

क) वासुदेव

ड) सानेगुरूजी

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2460**

# [5302]-4004
# M.A. (Part - II) (Semester - IV)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
# (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

## ii) सौंदर्यशास्त्र

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-* *1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* मानवी मनातील एक भावना या अर्थाने सौंदर्यभावनेचे महत्व विशद करा.

किंवा

सौंदर्यभावनेचे कार्य सविस्तर स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* कला आणि रूप यांचा परस्परसंबध काय असतो ते सांगून कलाकृतीची सेंद्रिय एकात्मता स्पष्ट करा.

किंवा

रूप म्हणजे काय? ते सांगून ॲरिस्टॉटलची रूप विषयक कल्पना स्पष्ट करा.

*प्रश्न 3)* 'भावनात्मक समाधानता म्हणजे परस्पर भिन्न भावनांचा मेळ असतो' ही संकल्पना सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

भावना विरेचन सिध्दांताचा परिचय करून द्या.

*प्रश्न 4)* ‘सौंदर्यशास्त्राच्या अभ्यासाने समीक्षा क्षमता विकसित होते? सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

सौंदर्यशास्त्र आणि साहित्यविचार यांचा अनुबंध सविस्तर स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) सौंदर्यभावनेचे स्वरूप

ब) कलाकृतीचे अर्थपूर्ण रूप

क) कलेच्या परिणामाचे स्वरूप

ड) सौंदर्यशास्त्र आणि समीक्षाविचार

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2460**

# [5302]-4004
# M.A. (Part - II) (Semester - IV)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
# (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

## iii) लेखनविद्या व निबंधलेखन

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
1) *सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
2) *सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* 'मानवी जीवन हे भाषिक व्यवहारावरच सर्वस्वी अवलंबून असते' स्पष्ट करा.

किंवा

भाषाव्यवहाराचे स्वरूप आणि आवश्यकता सविस्तर स्पष्ट करा.

*प्रश्न 2)* श्राव्य प्रसारमाध्यमांतील 'आकाशवाणी' साठी कोणत्या प्रकारचे लेखन अपेक्षित असते, साधार स्पष्ट करा.

किंवा

'आधुनिक प्रसारमाध्यमांमध्ये भाषेला अनन्यसाधारण महत्व आहे' साधार लिहा.

*प्रश्न 3)* संपादनासाठी आवश्यक असलेल्या विविध कौशल्यांचा परिचय करून द्या.

किंवा

जनसंपर्कासाठी संभाषण कौशल्य कसे असावे याविषयीची भूमिका स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* मराठी भाषा व साहित्याला समृध्द करण्यात वैचारिक निबंधाने दिलेले योगदान स्पष्ट करा.

किंवा

एक स्वतंत्र वाङ्मयप्रकार म्हणून निबंधाची वैशिष्ट्ये सोदाहरण स्पष्ट करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) अभिजात मराठी

ब) जाहिरातीतील मराठी

क) जनसंपर्कासाठी भाषिक कौशल्ये

ड) निबंध लेखनाचे स्वरूप

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2460**

# [5302]-4004
## M.A. (Part - II) (Semester - IV)
## MARATHI (मराठी)
## अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
## (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

### iv) मराठीतील वैचारिक साहित्य आणि साहित्याचा सामाजिक दृष्टीने अभ्यास

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
*1) सर्व प्रश्न सोडविणे आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* साहित्यातील सामाजिकतेची व्याप्ती स्पष्ट करा.

किंवा

साहित्यातील जीवनमूल्ये व कलामूल्ये यांचा आढावा घ्या.

*प्रश्न 2)* समाजातील घडणाऱ्या विविध घडामोडी, चळवळींचा प्रभाव साहित्यातून कसा अविष्कृत होतो सोदाहरण स्पष्ट करा.

किंवा

लेखकाच्या व्यक्तिमत्वावर प्रकाश टाकणाऱ्या सामाजिक घटकांचा परिचय करून द्या.

*प्रश्न 3)* 'भाषा ही व्यक्तीच्या नाही तर समाजाच्या आयुष्यात निर्माण होते' या विधानाची यथार्थता स्पष्ट करा.

किंवा

'साहित्य हे सामाजिक परिस्थितीचे अपत्य असते' सोदाहरण लिहा.

*प्रश्न 4)* साहित्याच्या सामाजिकतेविषयीचे कार्लमार्क्स यांचे विचार स्पष्ट करा.

किंवा

अभिरूचीचा साहित्यनिर्मितीवर काय परिणाम होतो याची चर्चा करा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) सामाजिक अभ्यासाचा हेतू

ब) ग्रामीण साहित्य चळवळ

क) लेखक-वाचक आणि साहित्यकृती

ड) लेखकाची अभिरूची

⊖⊖⊖

Total No. of Questions : 5]

**P2460**

# [5302]-4004
# M.A. (Part - II) (Semester - IV)
# MARATHI (मराठी)
# अभ्यासपत्रिका क्र. 8 (ऐच्छिक)
# (2013 Pattern) (Credit System) (Optional Paper)

## v) साहित्य : सर्जन व उपयोजन

*वेळ : 3 तास]* *[एकूण गुण : 50*

*सूचना :-*
*1) सर्व प्रश्न आवश्यक आहेत.*
*2) सर्व प्रश्नांना समान गुण आहेत.*

---

*प्रश्न 1)* साहित्य सर्जनामागील निर्मितीच्या विविध शक्तींचा परिचय करून द्या.

किंवा

साहित्यनिर्मिती प्रक्रियेच्या संदर्भात भारतीय मीमांसकांच्या विचारांचा थोडक्यात आढावा घ्या.

*प्रश्न 2)* साहित्यनिर्मितीवरील समकालीन परिस्थितीच्या प्रभावाची चर्चा करा.

किंवा

साहित्य निर्मितीच्या प्रक्रियेमध्ये 'समाज' या घटकाचे स्थान अधोरेखित करा.

*प्रश्न 3)* 'साहित्य सर्जनाच्या संदर्भात प्रसारमाध्यमांची भूमिका महत्वाची ठरते' सोदाहरण लिहा.

किंवा

साहित्य सर्जनामध्ये 'कालतत्व' हा घटक महत्वपूर्ण ठरतो. स्पष्ट करा.

*प्रश्न 4)* साहित्य सर्जनाशी संबंधित कोणत्याही एका साहित्य प्रकाराचे सौंध्दांतिक विवेचन करा.

किंवा

तुम्ही केलेल्या ललित साहित्याच्या प्रकल्पाचा अहवाल लिहा.

*प्रश्न 5)* कोणत्याही दोहोंवर टीपा लिहा.

अ) साहित्य सर्जन प्रक्रियेतील समस्या

ब) साहित्यसर्जन प्रक्रियेत पाश्चात्य मीमांसकांचा विचार

क) साहित्यनिर्मिती आणि भाषा

ड) आकाशवाणी या प्रसारमाध्यमाचे योगदान

⊖⊖⊖